पुणेरी पलटनचा तेलुगू टायटन्सवर ३९-३३ ने दमदार विजय! गुणतालिकेत गाठलं अव्वल स्थान

जयपूर, १३ सप्टेंबर २०२५: प्रो कबड्डी लीग २०२५ स्पर्धेतील ३२ वा सामना पुणेरी पलटन आणि तेलुगू टायटन्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात पुणेरी पलटनने दमदार कामगिरी करत ३९-३३ च्या फरकाने दमदार विजयाची नोंद केली आहे. यासह गुणालिकेत अव्वल स्थानी झेप घेतली आहे.

प्रो कबड्डी लीग स्पर्धेतील १२ व्या हंगामातील दुसऱ्या टप्प्यातील सामन्यांना सुरूवात झाली आहे. जयपूरच्या एसएमएस इनडोअर स्टेडियममध्ये पार पडलेल्या सामन्यात पुणेरी पलटनने दमदार खेळ केला. पुणेरी पलटनकडून अस्लम इनामदार आणि गौरव खत्रीने प्रत्येकी ७-७ गुणांची कमाई केली. तेलुगू टायटन्सकडून भरतने सुपर १० पूर्ण केलं. पुणेरी पलटनने बचावात दमदार खेळ केला. त्यामुळे पुणेरी पलटनने हा सामना ३९-३३ च्या फरकाने जिंकला.

या  सामन्यातील पहिली चढाई करण्यासाठी असलम इमानदार चढाईला आला. पहिल्याच चढाईत त्याने नेहमीप्रमाणे बोनस घेऊन दमदार सुरूवात केली. तेलुगू टायटन्सकडून भरतनेही बोनस गुण घेत आपल्या संघाचं खातं उघडलं. पुर्वार्धातील सुरूवातीची ५ मिनिटे झाल्यानंतर दोन्ही संघ ४-४ ने बरोबरीत होते. पुर्वार्धातील सुरुवातीच्या १० मिनिटात दोन्ही संघांमध्ये अटीतटीची लढत रंगली. पुणेरी पलटनचा  संघ ८-६ गुणांसह केवळ १ गुणाने आघाडीवर होता.

पुर्वार्धातील १२ व्या मिनिटाला तेलुगू टायटन्सचा संघ पहिल्यांदा ऑलआऊट झाला. यासह पुणेरी पलटनने १२-८ गुणांसह ४ गुणांची आघाडी घेतली. अस्लम इनामदारने पुर्वार्धात पुणेरी पलटनकडून सातत्याने चढाई केली आणि संघासाठी गुणांची कमाई देखी केली. पुर्वार्धातील शेवटची ५ मिनिटे शिल्लक असताना पुणेरी पलटनचा संघ १७-११ गुणांसह ६ गुणांनी आघाडीवर होता. शेवटची २ मिनिटे शिल्लक असताना तेलुगू टायटन्सचा संघ दुसऱ्यांदा ऑलआऊट झाला. यासह पुणेरी पलटनने २४-१३ गुणांसह ११ गुणांची आघाडी घेतली. २० मिनिटांचा खेळ पूर्ण झाल्यानंतर पुणेरी पलटनकडे २४-१४ गुणांसह १० गुणांची आघाडी होती.

उत्तरार्धात आदित्य शिंदेने १ गुण घेत पुणेरी पलटनच्या आघाडीत आणखी भर घातली. पुर्वार्धात पिछाडीवर राहिलेल्या तेलुगू टायटन्सने उतरार्धात पुनरागमन करण्यासाठी पूर्ण जोर लावला. पण आदित्य शिंदेने चढाईत गुणांची कमाई करणं सुरू ठेवलं. त्यामुळे उत्तरार्धातील सुरूवातीची १० मिनिटे पूर्ण झाल्यानंतर पुणेरी पलटनकडे ३३-२४ गुणांसह ९ गुणांची आघाडी होती. सामन्यातील १४ व्या मिनिटाला तेलुगू टायटन्सने

आदित्य शिंदेला सुपर टॅकल करत २ गुणांची कमाई केली. शेवटची २ मिनिटे शिल्लक असताना पुणेरी पलटनकडे ३८-२९ ने आघाडीवर होता.  शेवटी पुणेरी पलटनने हा सामना ३९-३३ च्या फरकाने जिंकला.